सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

दूरध्वनी (0253) 2230013

जावक क्रमांक – यचममुवि/परीक्षा-३/२०१९ दिनांक : २४.०४.२०१९

परिपत्रक

कृषि शिक्षणक्रम अंतिम परीक्षा, 2019

विद्यार्थ्यांकरीता गुणफेरमोजणी / स्कॅन कॉपी / पुनर्मूल्यांकन संदर्भात

महत्वाची सूचना

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषि विज्ञान विद्याशाखेंतर्गत माळी प्रमाणपत्र, कृषि अधिष्ठान, उद्यानविद्या पदविका, कृषि व्यवसाय पदविका, फळबागा उत्पादन पदविका, भाजीपाला उत्पादन पदविका, फुलशेती व प्रांगणउद्यान पदविका शिक्षणक्रमाची अंतिम प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक १८ ते २६ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत व अंतिम लेखी परीक्षा दिनांक ०५ ते १३ मार्च, २०१९ या कालावधीत आयोजित परीक्षांचे निकाल (Results) **दि.२०.०४.२०१९** रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपुस्तिकांची गुणफेरमोजणी, गुणफेरमोजणी / स्कॅन कॉपी / पुनर्मूल्यांकन **निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आंत म्हणजे दिनांक ०५.०५.२०१९ पर्यंत करता येईल.**

त्यासाठी विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, त्यासोबत ऑनलाईन निकालाची प्रिंटआऊट, आणि विहित शुल्क (Finance Officer, YCMOU, Nashik या नावाने राष्ट्रीयकृत बँकेच्या डीडीद्वारे किंवा, चलनाने विद्यापीठ मुख्यालयातील सेंट्रल बँकेत भरून) इ. कागदपत्र जोडून त्यांचा अर्ज विहित मुदतीत **सहायक कुलसचिव, परीक्षा कक्ष-३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन शिवार, नाशिक – ४२२ २२२ या पत्यावर** पोहचेल अशा बेताने पाठवावेत. **याशिवाय,** पोस्टाद्वारे अर्ज वेळेत न पोहचण्याची शक्यता विचारात घेऊन विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रत स्कॅन करून shinde_ka@ycmou.digitaluniversity.ac या मेलआयडी वर मेल करावी, म्हणजे त्यांच्या अर्जावर कार्यवाही वेळेत करता येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Exam Services येथे तसेच कृषि अभ्यासकेंद्रांवर उपलब्ध आहेत.

(डॉ.दिनेश भोंडे)

परीक्षा नियंत्रक (प्र.)

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :

०१. मा.संचालक, कृषि विज्ञान विद्याशाखा

०२. यचममुविचे सर्व कृषि अभ्यासकेंद्रे

०३. यचममुविचे सर्व विभागीय केंद्रे